नियमीत दिवाणी दावा क्र. ३९/२०१९
माणिकलाल वि. शालीकराम
निशाणी क्र. २० खाली

**प्रतिवादीतर्फे उलटतपास शपथेवर पुन्हा सुरु**
**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. जी. महाजन यांच्यामार्फत :-**

१०. मी सर्वे नं. १०० ची शेती पूर्वीपासून करतो व मी ती तशीच नेहमी करत राहावी असे मला वाटते. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यातील वादी– प्रतिवादी हे सर्व मुनियाबाईचे वारस/अपत्य आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बहिणी अधूनमधून शेतामध्ये येत असतात. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या बहिणींना शेतामध्ये येऊ देत नाही. माझ्या बहिणी सर्वे क्र. १००, १०१, १९९, २३३ मध्ये माझ्या बहिणी ज्योत करायला आलेल्या मला चालणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुनियाबाई आणि पाचेबाई यांनी या पूर्वी जे निर्णय घेतले ते कुटुंबाच्या भल्याकरीता घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, मुनियाबाई आणि पाचेबाई यांनी यापूर्वी जे निर्णय घेतले ते चुकीचे घेतले व त्याची मला आता कल्पना झाली. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या निर्णयाबाबत मी त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही.

११. हे म्हणणे खरे आहे की, मुनियाबाई आणि पाचेबाई ह्या कुटुंबाच्या कर्ता महिला होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मुनियाबाई, पाचेबाई आणि बल्ली हे आनंदराव यांच्याकडे राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, मुनियाबाई, पाचेबाई आणि बल्ली यांची सर्व देखभाल, देखरेख, खाणे–पिणे हे सर्व आनंदराव आणि माझ्या बहिणींनी केले. मुनियाबाई, पाचेबाई आणि बल्ली यांची सर्व सेवा आनंदराव, शालीकराम आणि झनकलाल यांनी केली.

**प्रश्न** – झनकलाल यांनी त्यांची सेवा केली याबाबत तुमच्याकडे कोणते कागदपत्र आहेत काय ? (वादीच्या विधीज्ञांनी सदर प्रश्नास हरकत घेतली आहे. सदरचा प्रश्न हा

उलटतपासामध्ये आलेल्या उत्तरामध्ये पुढे विचारण्यात आला. सदरचा मुद्दा हा लेखी जबाबात नाही. प्रतिवादीच्या विधीज्ञांनी सदर बाब लेखी जबाबात असल्याचे म्हटले आहे. सबब सदर प्रश्न हरकतीसह नोंदविण्यात येतो.)

**<u>उत्तर</u>** – माझ्याकडे असे कोणतेही दस्तऐवज नाहीत.

१२. हे म्हणणे खरे नाही की, झनकलाल यांनी त्यांची कधीही सेवा केली नाही त्यामुळे माझ्याकडे तसे दस्तऐवज नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मुनियाबाई, पाचेबाई आणि बल्ली यांची सर्व अंतीम क्रियाकर्म आनंदराव आणि शालीकराम यांनी केले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील सुरजलाल हे घरजावई म्हणून राहत असल्याने त्यांची सर्व सेवा करण्याची संधी आनंदराव आणि शालीकराम यांना मिळाली. हे म्हणणे खरे नाही की, शालीकराम आणि आनंदराव यांच्या सेवेवरुन खुश होऊन मुनियाबाई आणि पाचेबाई यांनी शालीकराम यांना दुलारा येथील सर्वे क्र. १०२ मधील १.५४ हेक्टर हे मृत्युपत्राने दिले. हे म्हणणे खरे नाही की, तसेच मुनियाबाई आणि पाचेबाई यांनी आनंदराव यांना सर्वे क्र. २४६ मधील ०.९३ हेक्टर हे मृत्युपत्राने दिले. हे म्हणणे खरे नाही की, सदर मृत्युपत्रांच्या आधारे आनंदराव आणि शालीकराम यांचा फेरफार झालेला आहे. साक्षीदार सांगतात की, फेरफार झाला आहे परंतु तो खोटा आहे. सदर फेरफार खोटा असल्याबाबत मी अपील केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मालक म्हणून आनंदराव आणि शालीकराम यांची नावे ७/१२ उताऱ्यावर लागलेली आहेत व ते उतारे मी अभिलेखावर दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अशा प्रकारे आनंदराव आणि शालीकराम हे प्रत्येकी त्यांच्या त्यांच्या सर्वे क्र. १०२ आणि २४६ या शेताचे मालक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे क्र. १०२ आणि २४६ हे वाटणीस पात्र नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, केवळ सर्वे क्र. १००, १०१, १९९ आणि २३३ याच जमिनी वाटणीस पात्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे शेत सर्वे क्र. १००, १०१, १९९ आणि २३३ वादी व प्रतिवादी यांच्या संयुक्तिक मालकीच्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, शेत सर्वे क्र. १००, १०१, १९९ आणि २३३ या चारही जमिनींवर वादी व प्रतिवादी यांची नावे संयुक्त मालक म्हणून लागलेली आहेत. साक्षीदार सांगतात की, नावे लागली आहेत परंतु ते खोटे आहेत.

१३.		हे म्हणणे खरे नाही की, शालीकराव आणि आनंदराव हे मृत्युपत्राद्वारे मालक झाल्याने त्यांनी शेत सर्वे क्र. १०२ आणि २४६ याची सिटी सर्वे मार्फत मोजणी केली. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यावेळी मी मोजणीला हजर होतो व तशी मी सही केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोजणी आजही अस्तिवात आहे व मी त्याच्याविरुद्ध तक्रार किंवा अपील केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. १००, १०१, १९९ आणि २३३ यावर रेकॉर्डप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचा संयुक्त ताबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बहिणींचा १००, १०१, १९९ आणि २३३ यामध्ये हक्क आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या बहिणींचा रेकॉर्डला मालकी हक्क असतांना देखील मी त्यांना सर्वे क्र. १०० आणि १०१ मध्ये येऊ देणार नाही. साक्षीदार सांगतात की, वाटणी होईपर्यंत येऊ देणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याबरोबर माझ्या बहिणी मालक असतांनादेखील मी त्यांना सर्वे क्र. १०० आणि १०१ मध्ये येऊ देणार नाही.

१४.		हे म्हणणे खरे नाही की, दि. १५/११/२०१९ रोजी नेहमीप्रमाणे माझ्या बहिणी सर्वे क्र. १०० आणि १०१ मध्ये ट्रॅक्टर घेऊन गहू पेरायला आल्या होत्या. साक्षीदार सांगतात की, माझ्या बहिणी आल्या नव्हत्या, शालीकराम आले होते. हे म्हणणे खरे आहे की, शालीकराम यांनी गहू पेरले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बहिणी आल्या नव्हत्या हे मी खोटे सांगत आहे.

<u>साक्षीदारांना तब्येतीची तक्रार असल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.</u>

श्रवणोत्तर स्वीकृत,		माझे समक्ष,

सही/–

रामटेक.		(ए. ए. शिरवळकर)

दिनांक : २०/११/२०२५.		सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रामटेक